स्थापना - १९८३

नों. क्र. एफ. ८१४७/ १९८३

# स्वाधार

## महिलांसाठी आधार केंद्र

केंद्रीय समाज कल्याण बोर्डाचे मान्यताप्राप्त कौटुंबिक सल्ला केंद्र

भेद सारे मावळू द्या वैर साऱ्या वासना
मानवाच्या एकतेची पूर्ण होवो कल्पना

## वार्षिक अहवाल

एप्रिल २०२४ ते मार्च २०२५

केशव गोरे स्मारक ट्रस्ट, 'स्मृती' आरे रोड, गोरेगांव (प.), मुंबई - ४०० १०४.
Website : www.swadhar.com



१७ जुलै २०२४ मृणाल ताई गोरे स्मृतीदिन बलसागर भारत होवो कार्यक्रम सादर करताना सानिका आपटे, धिरेश जोशी , ओंकार गोवर्धन



बुवा - बाबा आणि आपण
वंदना शिंदे
दैनंदिन जीवनातील अंधश्रद्धा



दिवाळी शिबीर



गंमत - जंमत शिबीर



गंमत - जंमत शिबीर




शालान्त परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ

# आमची स्फूर्तीस्थाने

## स्वाधारच्या संस्थापक अध्यक्षा



मा. मृणालताई गोरे



मा. प्रा. मीनाक्षीताई आपटे

यांच्या पदचिन्हांवरून चालण्याचा आम्ही प्रयत्न करतो.






पौष्टिक आहार

शैक्षाणिकसाहित्य वाटप






सॅनिटरी पॅड वाटप







सावित्रीबाई फुले जयंती-महिला मेळावा ॲड. जागृती गांवकर

आंतरराष्ट्रीय महिला दिन - सेल्फी







वर्धापन दिन - निर्भया पथकाचा सत्कार

## स्वाधारची ध्येय धोरणे :

१) शारीरिक व मानसिक त्रासाने पिडीत अशा महिलांना मदत करणे.

२) स्त्रियांना त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शैक्षणिक, वैद्यकीय, आर्थिक मदत करणे, कौटुंबिक सल्ला देणे आणि जरूर असेल त्याप्रमाणे कायदेशीर सल्ला देणे व कायदेशीर कारवाई करण्यास मदत करणे.

३) कौटुंबिक अत्याचाराला व हिंसेला बळी पडलेल्या स्त्रियांना आधार व संरक्षण देणे.

४) महिलांवर होणाऱ्या अत्याचाराबद्दल समाजात जाणीव व जागृती निर्माण करणे.

५) महिलांना त्यांच्या न्याय हक्कांची जाणीव करून देणे, तसेच समाजातील एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून त्यांना जागृत व आत्मनिर्भर करणे. ह्या प्रकारचे कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांच्याशी सहकार्य करून त्यांची मदत घेऊन या कामाची व्याप्ती वाढविणे.

# विनम्र श्रद्धांजली

- भारताचे माजी पंतप्रधान जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ मा. डॉ. मनमोहनसिंग - २६ डिसेंबर २०२४
- प्रसिद्ध उद्योगपती आणि थोर समाजसेवक पद्मविभूषण रतन टाटा - ९ ऑक्टोबर २०२४
- जगप्रसिद्ध तबला वादक पद्मविभूषण झाकीर हूसेन - १५ डिसेंबर २०२४
- विख्यात खगोलशास्त्रतज्ज्ञ पद्मविभूषण जयंत नारळीकर - २० एप्रिल २०२५
- स्वातंत्र सेनानी व जेष्ठ समाजवादी कार्यकर्ते मा. दत्तात्रय गांधी (आप्पा गांधी) - ३ जून २०२५

या सर्वांना आणि याखेरीज ज्ञात-अज्ञात हितचिंतकांना ज्यांचे दुःखद निधन झाले त्या सर्वांना स्वाधारची विनम्र आदरांजली.

# सार्थ अभिमान

- ज्योती गांधी यांना महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडी (TDF) तर्फे शिक्षक संघटनेतील कार्याबद्द्ल जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.
- अभिनव शिक्षण प्रसारक मंडळ या प्रतिष्ठित संस्थेने अमृत महोत्सव समारंभात विशेष कार्य करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा गौरव केला. त्यामध्ये मंगला मराठे यांचा सामाजिक कार्याबद्दल गौरव केला.
- सुप्रिया बोडाजी यांचा इनर व्हील क्लब चेंबूर टियारा तर्फे प्रतिकूल परिस्थिती मधील मुलींच्या शिक्षणासाठी निःस्वार्थीपणाने केलेल्या कार्याबद्दल गौरव केला.

या सर्वांचा आम्हाला अभिमान आहे.

## वार्षिक अहवाल - सन २०२४-२०२५

स्वाधारच्या संस्थापक व माजी अध्यक्ष मा. मृणालताई गोरे व मा. प्रा. मीनाक्षी आपटे यांच्या स्मृतीस अभिवादन करून स्वाधार संस्थेचा एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या वर्षभराच्या वार्षिक अहवाल आम्ही आपल्यासमोर ठेवत आहेत.

भारतीय राज्य घटनेने सुरूवातीपासूनच धर्म, जात, वर्ण, लिंग इ. वरून होणाऱ्या भेदभावास मनाई करून समानतेचे तत्व अंगिकारले. १९७५ पासून स्त्रीचळवळीने जोम धरला. स्त्रियांना आत्मभान आले त्या सक्षम बनू लागल्या. सर्व क्षेत्रात यशस्वीपणे वावरू लागल्या. पारंपरिक दृष्टया पुरूषांच्या मानलेल्या क्षेत्रामध्येही स्त्रियांनी कर्तृत्वाचा ठसा उमटविला. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आरक्षणाच्या धोरणामुळे स्त्रिया राजकारणात सक्रीय झाल्या.

हे सगळे असले तरी खऱ्या अर्थाने सक्षम स्त्रियांची संख्या अत्यल्प म्हणावी अशीच आहे. एकूण स्त्रियांच्या तुलनेत त्यांची टक्केवारी काळजी वाटावी अशीच आहे. स्त्री शिक्षणाचा प्रश्न आहे. स्त्रियांवरील लैंगिक अत्याचार दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यातील हिंसकपणा वाढत आहे. केवळ स्त्रियांसमोरच नाहीत तर एकूणच समाजात प्रत्येक घटकासमोर प्रश्न आहेत. व्यक्तिच्या खाजगी जीवनावरही अंकुश येऊ पहातोय हे आणि असे सर्व प्रश्न आणि त्या प्रश्नांबाबत प्रबोधनात्मक कार्यक्रम समाज स्वास्थ्याच्या दृष्टीने आम्हाला महत्वाचे वाटतात.

या दृष्टीने काम करणे आणि सर्व जाती, धर्म, वर्णाच्या स्त्रियांना सक्षम बनविण्यासाठी, त्यांची स्वप्रतिमा उंचावण्यासाठी मदत करणे. हे स्वाधारचे मुख्य उद्दिष्ट आहे. स्त्रियांना त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सहाय्य करण्यासाठी स्वाधार, कुटुंब सल्ला केंद्र चालविते. त्याचबरोबर भविष्यात समस्या उभ्या राहू नयेत, स्त्रियांचा आत्मविश्वास वाढावा, स्त्रियांना समाजात सन्मानाचे स्थान मिळावे, समाजात लिंगसमभाव रुजावा. या दृष्टीने स्वाधार सातत्याने प्रबोधनात्मक व जनजागृतीचे कार्यक्रम राबविते. यात विविध वयोगटातील स्त्री-पुरूष, युवक-युवती व मुलांसाठी शिबिरे, कार्यशाळा, व्याख्याने इत्यादींचा समावेश असतो.

स्वाधारची उद्‌दिष्टे, ध्येय, धोरणे व कार्य लक्षात घेऊन केंद्रीय समाज कल्याण बोर्डाने १९८७ मध्ये स्वाधारला अधिकृत कौटुंबिक सल्ला केंद्र म्हणून मान्यता दिली व वार्षिक अनुदान मंजूर केले आहे.

स्वाधारकडे येणाऱ्या समस्याग्रस्त स्त्रियांच्या सोयीसाठी मुंबईत १९८८ मध्ये चेंबूर येथे, १९९१ मध्ये मुलुंड येथे व २०17 पासून चुनाभट्टी येथे स्वाधारच्या शाखा सुरू करण्यात आल्या.

तसेच पुणे येथे १९९५ पासून स्वतंत्र केंद्र कार्यरत आहे.

# अध्यक्षांचे मनोगत

मा. मृणालताई गोरे आणि मा. मीनाक्षीताई आपटे यांनी भक्कम वैचारिक पायावर स्वाधार संस्था उभी केली. त्यांनी दिलेल्या या वैचारिक शिदोरीमुळेच आजही स्वाधार सक्षमपणे कार्य करीत आहे.

स्वाधार संस्था ही महिलांसाठी काम करणारी संस्था आहे. कुटुंबातील प्रत्येकाचा सन्मान राखला जाईल व कुटुंबस्वास्थ्य राखले जाईल या दृष्टीने स्वाधार समस्या निवारणाचे काम करते व त्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविते. गेली चार दशके स्वाधारचे कार्यकर्ते व कार्यालयीन सहकारी हे काम सातत्याने आणि निरपेक्षपणे करीत आहेत याचा मी अभिमानाने उल्लेख करते.

यावर्षीचा विशेष म्हणजे यावर्षी महिला वर्षाला ५० वर्षे झाली. खरंतर महिला चळवळीची सुरुवात म. ज्योतिबा फुले, आगरकर यांच्या कार्यातून पावणे दोनशे वर्षांपूर्वीच झाली आहे. त्यावेळी जाचक रूढी परंपरांमुळे ओढवणाऱ्या दयनीय परिस्थितीतून आणि जाचातून महिलांना सोडविण्यासाठी केलेले विचार आणि उपाय असे तिचे स्वरुप होते. सर्व सामान्य स्त्रियांचा त्यात प्रत्यक्ष सहभाग अभावानेच होता. पण यातूनच स्त्रियांमध्ये स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव होऊ लागली आणि या जाणीवेतूनच चळवळीची बीजे रोवली गेली. स्त्रियांच्या मनात जागलेल्या या स्वत्वामुळे आणि स्त्रीशिक्षणामुळे कुटुंबाच्या रुपात आणि वातावरणात हळूहळू बदल होऊ लागले. या पायावर आंतरराष्ट्रीय महिला वर्षापासून चळवळीला संघटीत चळवळीचे स्वरूप आले आणि ती जोमाने चालू झाली. स्वाधार या चळवळीचा भाग राहिला आहे आणि पुढेही राहील.

चळवळीमुळे स्त्रियांना आत्मभान आले. आज स्त्रिया कुठलाही अन्याय अत्याचार मुकाटपणे सहन करीत नाहीत. तर त्याविरुद्ध दाद मागू लागल्या आहेत. कुटुंब सल्ला केंद्रात येणाऱ्या महिलाही आता केवळ रडत रडत येत नाहीत तर त्यांच्या परीने समस्येवर उपाय म्हणून काही मागण्या घेऊन येतात. त्यांना सन्मानाने जगायचे आहे. हे चित्र आशादायक आहे. पण त्याचबरोबर घरात आणि घराबाहेर होणाऱ्या अत्याचारांची संख्याही लक्षणीय आहे. याचा विचार आणि उपाय करणेही गरजेचे आहे.

आज सोशल मीडियाद्वारे दिखाऊ आणि सनसनाटी गोष्टींचा सतत मारा होत असतो. काही दिवसांपूर्वी बंगळूरू येथील इंजिनिअरच्या आत्महत्येची बातमी व त्यासंबंधीचे व्हिडीओज् सतत चालू होते. एका तरुण माणसाच्या मृत्यूबद्दल सगळ्यांनाच हळहळ वाटली. परंतू सोशल मिडीयाने या व्हिडीओज्चे सादरीकरण ज्या पद्धतीने केले त्यामुळे मुली कायद्याचा गैरफायदा घेऊन नवऱ्याला छळतात आणि लुबाडतात असा समज लोकांमध्ये सोडला गेला. या घटनेची दुसरी बाजू मात्र मिडीयाने मांडली नाही. म्हणून मीडियातून मिळणाऱ्या माहितीबाबत आपण सजग आणि तर्कशुद्ध राहिले पाहिजे.

असेच काहीसे पारंपारिक आणि सांस्कृतिक गोष्टींबद्दल होत आहे. आपल्या संस्कृतीबद्दल आणि परंपरांबद्दल आस्था नक्की असावी पण आज त्या आस्थेचा ज्वर होऊ लागला आहे. ही चिंतेची बाब आहे. हा ज्वर वांशिक, जातीय, प्रांतीय, धार्मिक सलोख्याला धक्का लावणारा आणि महिलांना तर्कविसंगत, दिखाऊ कर्मकांडात रमवून मागे खचणारा आहे. याबाबत सजगता आणणे गरजेचे आहे.

स्वाधार या सर्व मुद्यांना घेऊन लोकांनी सजग आणि सतर्क राहावे यासाठी प्रबोधनात्मक कार्यक्रम उपक्रम करीत आहे. मानवता, समानता, वैज्ञानिक दृष्टीकोन जागविण्याच्या कामात स्वाधारचा खारीचा वाटा नेहेमीच राहील.

हे कार्यक्रम, उपक्रम राबविणे कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळे, सहकारी संस्थांच्या सहकार्यामुळेच शक्य होते. केवळ प्रासंगिक कार्यक्रमच नाहीत तर सातत्याने चालणारे कार्य आणि स्वाधारची आजवरची वाटचाल हे कार्यकर्त्यांची निस्वार्थ मेहनत, सहकाऱ्यांची साथ आणि हितचिंतकांचा पाठिबा याचे फळ आहे. यामध्ये केशव गोरे स्मारक ट्रस्ट, आमचे देणगीदार यांचाही मोलाचा वाटा आहे.

स्वाधारच्या कार्यात सर्वतोपरी सहकार्य करणाऱ्या केशव गोरे ट्रस्टचे विश्वस्त, कार्यकर्ते व कर्मचारी तसेच स्वाधारचे देणगीदार, हितचिंतक या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानते आणि स्वाधारच्या सर्व कार्यकर्त्या व कार्यालयीन सहकाऱ्यांना शुभेच्छा देते.

**मंगला मराठे**

अध्यक्ष

# स्वाधारचे उपक्रम

## कौटुंबिक सल्ला केंद्र -

कौटुंबिक सल्ला केंद्र हा स्वाधारचा मुख्य उपक्रम आहे. हे कुटुंब सल्ला केन्द्र १९८७ पासून केन्द्रीय समाजकल्याण बोर्डाने अधिकृत केला आहे. समाजातील सर्व जातीधर्माच्या आणि सर्व स्तरातील महिला आपल्या समस्या घेऊन स्वाधार मध्ये येतात. कौटुंबिक सल्ला म्हणजे केवळ काहीतरी तडजोड करुन कुटुंबियांनी एका घरात रहाणे इतका सिमित अर्थ स्वाधारला अभिप्रेत नाही. तर कुटुंबातील सर्वांना समस्येचे मूळ समजावून सांगून सर्वांना सन्मानाने एकत्र रहाता येईल असा मार्ग सुचविणे हे कुटुंब सल्ला केंद्राचे उद्दिष्ट आहे.

समस्याग्रस्त महिलेचे लेखी निवेदन घेणे, तिचे आणि समोरच्या व्यक्तीचे म्हणणे स्वतंत्रपणे ऐकून घेणे. दोघांची एकत्र बैठक घेणे, दोघांना समुपदेशन करणे, गृहभेट करणे, आवश्यक असेल तिथे दोन्ही बाजूकडील नातेवाईकांबरोबर बैठक घेणे, त्यांनाही समुपदेशन करणे आणि यातून सर्वमान्य आणि सन्मान्य तोडगा सुचविणे जेणेकरुन कुटुंबातील अन्याय दूर होईल आणि शक्यतो कुटुंब तुटणार नाही - ही स्वाधारच्या कौटुंबिक सल्ला केंद्राच्या कामाची पद्धत आहे. समुपदेशनाचे हे काम पूर्णपणे विनामूल्य केले जाते.

यावर्षी गोरेगाव केंद्र व चुनाभट्टी शाखेत समुपदेशनाचे काम चालले. यावर्षी एकूण १६२ स्त्रिया स्वाधारकडे त्यांच्या समस्या घेऊन आल्या. यापैकी गोरेगाव येथे १५३ व चुनाभट्टी येथे ९ स्त्रिया आल्या.

## एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या वर्षात स्वाधार कडे आलेल्या समस्याग्रस्त महिलांच्या सामाजिक परिस्थितीची वर्गवारी

| **धर्म** | **गोरेगाव** | **चुनाभट्टी** |
|---|---|---|
| हिंदू | ५८ | ०२ |
| मुस्लिम | २४ | – |
| ख्रिश्चन | ०३ | – |
| बौद्ध | ६२ | ०७ |
| आदिवासी | ०३ | – |
| अन्य | ०३ | – |
| **एकूण** | **१५३** | **९** |

| **वयोगट** | | |
|---|---|---|
| १५ पेक्षा कमी | – | – |
| १५ ते २५ | ६६ | – |
| २६ ते ५० | ६३ | ०८ |
| ५१ ते ७० | १८ | ०१ |
| ७१ पेक्षा जास्त | ०६ | – |
| **एकूण** | **१५३** | **०९** |

| **शिक्षण** | | |
|---|---|---|
| अशिक्षित | १६ | ०१ |
| प्राथमिक शिक्षण | २० | – |
| माध्यमिक शिक्षण | २४ | ०७ |
| उच्च माध्यमिक | ५० | – |
| पदवीधर | ३५ | ०१ |
| उच्चशिक्षित | ०४ | – |
| व्यावसायिक शिक्षण | ०४ | – |
| **एकूण** | **१५३** | **०९** |

| **आर्थिक परिस्थिती** | | |
|---|---|---|
| स्वावलंबी | ४० | ०५ |
| थोड्या प्रमाणात स्वावलंबी | ८३ | ०२ |
| परावलंबी | ३० | ०२ |
| **एकूण** | **१५३** | **०९** |

## एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या वर्षात स्वाधार कडे आलेल्या समस्याग्रस्त महिलांच्या सामाजिक परिस्थितीची वर्गवारी

| नं. | समस्येचे स्वरुप | गोरेगाव | चुनाभट्टी |
|---|---|---|---|
| १) | स्त्रीचा सासरी होणारा शारीरिक/मानसिक छळ | ५० | ०९ |
| २) | स्त्रीला नवऱ्याने सोडून दिले | १४ | ०१ |
| ३) | संशय, वाईट वागणूक | ६५ | ०५ |
| ४) | नवऱ्याचे विवाहबाह्य संबंध/दुसरे लग्न | २३ | - |
| ५) | नवरा व्यसनी असणे | ६१ | - |
| ६) | हुंडाबळी/हुंड्याची मागणी | - | ०५ |
| ७) | विवाहपूर्व मातृत्व | - | - |
| ८) | नोकरी / आर्थिक मदतीची गरज | ०३ | - |
| ९) | मालमत्तेसंबंधी समस्या | २० | - |
| १०) | स्वतःची/मुलांची राहण्याची सोय | - | - |
| ११) | लग्नासाठी मदत / विवाहपूर्व मार्गदर्शन | ०२ | - |
| **१२)** | **अन्य --** | | |
| | १) स्वतःच्या मुलांकडून / सुनेकडून त्रास | २० | - |
| | २) पैशाची मागणी | - | ०५ |
| | ३) स्वभाव दोष | १६ | - |
| | ४) मूल न होणे / मुली झाल्या म्हणून | ०२ | - |
| | ५) उपासमार करणे | २३ | - |
| | ६) कुटुंबातील नातलगाविरुध्द तक्रार | १२ | - |
| | ७) नवरा दुर्लक्ष करतो | ०७ | ०३ |
| | ८) नवरा चरितार्थास पैसे देत नाही | १९ | ०६ |
| | ९) नवरा मानसिक रुग्ण | ०१ | - |
| | १०) मुलांची आबाळ | २१ | ०३ |
| | ११) घरकामासाठी पिळवणूक | ०३ | - |
| | १२) आरोग्याविषयी | - | - |
| | १३) लैंगिक समस्या | ०३ | - |

## एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या वर्षात स्वाधार कडे आलेल्या समस्याग्रस्त महिलांच्या सामाजिक परिस्थितीची वर्गवारी

| नं. | समस्येचे स्वरुप | गोरेगाव | चुनाभट्टी |
|---|---|---|---|
| | १४) लग्न मोडले | - | - |
| | १५) नवरा बेपत्ता | - | - |
| | १६) संसारात माहेरच्यांकडून हस्तक्षेप | १८ | ०१ |
| | १७) संसारात सासरच्यांकडून हस्तक्षेप | २१ | ०१ |
| | १८) अन्य - जावेविरुध्द / जावयाविरुध्द | ०३ | - |
| | **समस्या सोडविण्यासाठी केलेले प्रयत्न** | | |
| १) | स्त्रियांच्या बाबतीत समझोता झाला | ६५ | ०१ |
| २) | समुपदेशन चालू आहे | २१ | ०४ |
| ३) | कायदेविषयक मदत | २४ | ०२ |
| | अ) घटस्फोटासाठी | १२ | - |
| | आ) स्त्रीधन / सामान मिळवून दिले | ०८ | - |
| | इ) पोटगी | ०३ | - |
| | ई) मुलांचा ताबा मिळवून दिला | १९ | - |
| | उ) मालमत्ते समस्यांबाबत | १९ | - |
| ४) | पोलीसांची मदत मिळवून दिली | १० | ०१ |
| ५) | वैद्यकीय मदत मिळवून दिली | ०३ | - |
| ६) | निवास विषयक सोय केली | - | - |
| ७) | दुसऱ्या संस्थेत मदतीसाठी पाठवले | - | - |
| ८) | नोकरी/आर्थिक मदत केली | - | - |
| ९) | प्रतिसादा अभावी केस बंद केली | ०३ | - |
| १०) | **इतर** | | |
| | अ) बाहेरुन वकीलाची मदत घेतली | ०४ | ०२ |
| | आ) कुटुंबाकडून समझोत्याचे प्रयत्न | १२ | - |
| | इ) कायदेविषयक सल्ला | २५ | ०२ |
| | ई) समस्याग्रस्त महिलेला पुढे कारवाई करण्याची इच्छा नसल्याने केस बंद केली. | ०५ | ०१ |

## विशेष सल्लागार समिती

महिलांच्या समस्या निवारणाच्या कामात काही वेळा वकीलांच्या व पोलिसांच्या मदतीचीही गरज भासते. काहीवेळा वैद्यकीय व मानसोपचाराची गरज भासते. तेव्हा ही मदत स्वाधारकडून उपलब्ध करुन दिली जाते. या क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत घेतली जाते. यासाठी या तज्ज्ञांची पदाधिकाऱ्यांची एक विशेष सल्लागार उपसमिती कार्यरत असते. आवश्यकता भासल्यास ही समिती समस्याग्रस्त महिलेला समस्या सोडविण्यास मदत करते.

**२०२४-२०२५ या कालावधीसाठी असलेल्या सल्लागार समितीचे सदस्य :-**

| | |
|---|---|
| श्रीमती मंगला मराठे (अध्यक्ष) | श्रीमती लता देसाई (उपाध्यक्ष) |
| ज्योती गांधी (कार्यवाह) | नीता बडवे (खजिनदार) |
| रोहिणी कुलकर्णी (समुपदेशक) | अंकिता भगत (समुपदेशक) |
| ॲड. शुभदा पेठे (वकील) | निलेश गवळी (प्रोटेक्शन ऑफिसर) |
| डॉल्फी डिसोझा (सामाजिक कार्यकर्ता) | वन स्टॉप जोगेश्वरी चे प्रतिनिधी |
| वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गोरेगाव पोलीस स्टेशन | निलम गिरप (मानसशास्त्रज्ञ) |

## अंतर्गत तक्रार निवारण समितीतील सहभाग

कायद्यानुसार प्रत्येक आस्थापनामध्ये स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराबाबत दाद मागण्यासाठी अंतर्गत तक्रार निवारण समिती असणे बंधनकारक आहे. या समितीत सामाजिक संस्थेचा एक प्रतिनिधी असणे आवश्यक असते. स्वाधारच्या कार्यकर्त्याही अशा समित्यांच्या सदस्य आहेत. समस्या निवारणाबरोबर या आस्थापनाच्या महिला विकास कक्षाने आयोजित केलेल्या जाणीव जागृतीच्या कार्यक्रमात त्या सक्रीय सहभागी असतात.

१) घनश्यामदास सराफ कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड मॅनेजमेंट - मंगला मराठे
२) रुपारेल कॉलेज - रोहिणी कुलकर्णी
३) सरकारी चिकित्सा सामग्री भंडार - रोहिणी कुलकर्णी
४) अडेका इंडिया प्रा. लि. - मंगला मराठे
५) जे. एम. पटेल कॉलेज ऑफ कॉमर्स - रोहिणी कुलकर्णी
६) स्टेट बँक ऑफ इंडिया रिजनल बिजनेस ऑफिस - मंगला मराठे
७) इंडियन ऑडीट ॲन्ड अकाऊंट डिपार्टमेंट - रोहिणी कुलकर्णी
८) प्रादेशिक सहआयुक्त पशु संवर्धन, मुंबई विभाग - रोहिणी कुलकर्णी
९) दुर्गादेवी सराफ इंस्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज - मंगला मराठे
१०) पे अण्ड अकौंट (शिपिंग) - मंगला मराठे
११) कॉर्पोरेट सेंटर एस्टॅब्लिशमेंट स्टेट बँक ऑफ इंडिया - नवी मुंबई - राधा कर्णिक

## शैक्षणिक उपक्रम

समस्या निवारणा / बरोबरच स्त्रियांना सक्षम आणि स्वावलंबी बनविणे हे स्वाधारचे उद्दिष्ट आहे. केवळ स्वाधारकडे येणाऱ्या समस्याग्रस्त महिलाच नाहीत तर एकूणच स्त्रियांना व मुलींना विचाराने सक्षम आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याचा स्वाधारचा प्रयत्न असतो. यासाठी स्वाधार सातत्याने चालणारे विविध शैक्षणिक उपक्रम विशेषतः स्त्रियांसाठी व मुलींसाठी राबविते. यात शैक्षणिक मदत देणारे व जीवनशिक्षण देणारे उपक्रम राबविले जातात.

शैक्षणिक मदत देणारे उपक्रम

१) "**दत्तक पालक उपक्रम**" - स्त्रियांना व मुलींना सक्षम बनवायचे तर त्याचा पाया शालेय शिक्षणात घातला जातो. वस्तुतः शिक्षण हा प्रत्येक मुला-मुलीचा अधिकार आहे. परंतु प्रतिकूल परिस्थितीपायी अनेक मुलांना शालेय शिक्षण अर्धवट सोडावे लागते त्यातही मुलींच्या गळतीचे प्रमाण आजही चिंताजनक आहे. या गळतीचे मुख्य कारण आर्थिक दुर्बलता हे असते. या परिस्थितीतील मुलींवर शाळा सोडण्याची वेळ येऊ नये. त्यांचे किमान शालान्त परीक्षेपर्यंतचे शिक्षण पूर्ण व्हावे या दृष्टीने स्वाधार लोकसहभागातून दत्तक पालक उपक्रम राबविते. या उपक्रमातील लाभार्थी मुलींची निवड शाळांशी संपर्क साधून, गृहभेट देऊन, सर्वेक्षण करुन केली जाते. लाभार्थी विद्यार्थिनींना वह्या-पुस्तके व अन्य शैक्षणिक साहित्य, गणवेश संगणक वर्ग किंवा शैक्षणिक वर्गाच्या शुल्कासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. समाजातील काही व्यक्ती व संस्था शैक्षणिक साहित्य वस्तुरुप देणगी म्हणून देतात. या मुलींना केवळ आर्थिक मदत देऊन आम्ही थांबत नाही तर त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने शिबिरे, व्याख्याने, स्पर्धाही आयोजित करतो.

२) "**बालरंग**" - स्वाधारकडे येणाऱ्या समस्याग्रस्त महिलांपैकी काही महिला आर्थिक दृष्टया अतिशय दुर्बल असतात. अशा परिस्थितीत त्यांच्या मुलांवर शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ येऊ नये म्हणून स्वाधार गोरेगाव केंद्रात बालरंग उपक्रम राबविते. या उपक्रमांतर्गत या मुलांना शैक्षणिक मदत दिली जाते. त्याच प्रमाणे दत्तक पालक उपक्रमातील विद्यार्थिनींसाठी आयोजित होणाऱ्या सर्व कार्यक्रम शिबीरे व्याख्याने इ. मध्ये या मुला - मुलींना सहभागी करुन घेतले जाते.

३) "**शिक्षण सहाय्य**" - दत्तक पालक व बालरंग उपक्रमातून शालेय शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थी विद्याथिनींना महाविद्यालयीन शिक्षणासाठी व उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत दिली जाते.

केंद्र तसेच शाखांमध्येही हे उपक्रम राबविले जातात.

# गोरेगाव केंद्राचे शैक्षणिक उपक्रम - २०२४-२५

गोरेगाव केंद्राच्या दत्तक पालक उपक्रमात यावर्षी एकूण १२७ विद्यार्थिनी सहभागी करुन घेतल्या.

या विद्यार्थिनींच्या सर्वेक्षणानुसार त्यांची कौटुंबिक परिस्थिती पुढील प्रमाणे आढळली.

१) अनाथ, नातेवाईकांसोबत राहते - ०५
(हे कुटुंब आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे)

२) एकच पालक आहे २०

३) आर्थिकदृष्ट्या अतिदुर्बल कुटुंबातील आहेत - १०३

| गोरेगाव केंद्रातील लाभार्थी मुली खालील शाळांच्या विद्यांर्थींनी आहेत. | | |
|---|---|---|
| १) | मुरारराव राणे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, गोरेगाव | ३४ |
| २) | अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव | १२ |
| ३) | आदर्श विद्यालय, गोरेगाव | २० |
| ४) | महाराष्ट्र विद्यालय | २८ |
| ५) | सन्मित्र मंडळ विद्यामंदिर, गोरेगाव | ३४ |
| | एकूण | १२८ |

दत्तक पालक उपक्रमातील १९ विद्यार्थिनी शालान्त परीक्षेला बसल्या त्यांचा निकाल १६ विदयार्थिनी उत्तीर्ण झाल्या. २ मुलींना ८०% पेक्षा अधिक गुण मिळाले.

भविषा शितप ९२% आरती पाटील ८५.५०%

**बालरंग**

या वर्षी या उपक्रमात मुला मुलींना सहभागी करुन घेतले. यापैकी वेदांत राणे या विद्यार्थ्याला शालांत परिक्षेत ९०.९२% गुण मिळाले.

**शिक्षण सहाय्य**

दत्तक पालक व बालरंग उपक्रमातील शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या २१ विद्यार्थी विद्यार्थिनींना महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी स्वाधार कडून आर्थिक मदत दिली.

# गोरेगाव केंद्राने आयोजित केलेले कार्यक्रम

**दत्तक पालक उपक्रमांतर्गत आयोजित केलेले कार्यक्रम**

**१. गंमत जम्मत शिबीर - १५.०४.२०२४**

दत्तक पालक व बालरंग उपक्रमातील विद्यार्थ्यांसाठी गम्मत - जम्मत शिबीर आयोजित केले होते. पहिल्या सत्रात मुलींनी गटागटाने विविध ठिकाणांची दृश्ये नाटयरुपाने उभी केली. यामध्ये बसस्टॉप, पोस्टऑफिस, शाळा, बँक, हॉस्पिटल इ. ठिकाणे लहान लहान तपशिलांसह सादर केली.

दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांना चित्रकार **अनिल कुबल** यांनी पॉट पेंटिंग, बॅग पेंटिंग, बॉटल पेंटिंग शिकविले व करुन घेतले.

**शैक्षणिक साहित्य वाटप - ११.०६.२०२४**

११ जून या पूज्य साने गुरुजी यांच्या स्मृतिदिनी दत्तक पालक व बालरंग उपक्रमातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश वाटप करण्यात आले. यामध्ये जायंट सी ग्रीन ग्रुपचे श्री अजित सेठ आणि त्यांचे सहकारी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. त्यांनी विद्यार्थ्यांना दप्तर, डबा, पाण्याची बाटली, परीक्षा पॅड रेनकोट इत्यादि साहित्य रोज लागणारे शैक्षणिकसाहित्य दिले व मुलांना अल्पोपहार दिला.

हिमगिरी ग्लोबल गुरुकुलच्या डॉ. प्रतिमा जोशी यांनी ५० डझन वह्या आणि १०० कंपास पेट्या वस्तुरुप देणगी म्हणून दिल्या.

अनुपम स्टेशनरी गोरेगाव यांनी पेन, पेन्सील, रबर इ. लेखन साहित्याचे १०० किट्स दिले. एकूण १७० विद्यार्थ्यांना साहित्य वाटप केले.

**सकस आहार मार्गदर्शन - १५.०६.२०२४**

दत्तक-पालक उपक्रम व बालरंग उपक्रमातील विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी आहारतज्ञ **संपदा बक्षी** यांचा स्वस्त व सकस आहार या विषयावर मार्गदर्शनात्मक कार्यक्रम करण्यात आला.

संपदा बक्षी यांनी सोप्या भाषेत आहाराबाबत काय खावू नये हयाबद्दल समजून सांगितले आपल्या आहारातील भाज्या, धान्य, फळे यांचे महत्व विषद केले. त्यातील कर्बोदके तसेच स्निग्ध पदार्थ आणि जीवनसत्वे यांबददल तसेच स्वस्त परवडणारे आरोग्यदायी आणि जीवनाश्यक पदार्थांबदृल माहिती दिली. पालकांच्या प्रश्नांचे शंकांचे निरसन केले.

**पालक पाल्य भेट शालांत परीक्षा उर्तीर्ण विद्याार्थिनींचा कौतुक समारंभ १३ - ०७- २०२४**

शालांत परीक्षा पास झालेल्या दत्तक पालक उपक्रम व बालरंग उपक्रमातील विद्यार्थ्यांचा दत्तक पालकांच्या व स्वाधार कार्यकर्त्यांच्या हस्ते भेट वस्तू देवून सत्कार करण्यात आला. याच वेळी दत्तक पाल्य व पालक यांची भेट हा कार्यक्रम होता.

**कला शिबीर - २९.१०.२०२४**

दत्तक पालक व बालरंग उपक्रमातील विद्यार्थ्यांसाठी दिवाळी सुट्टीतील कला शिबिरात पहिल्या सत्रात समाज **सुधारकांनी ज्या सुधारणा समाजासाठी केल्या त्याचा उदेश आग्रह व त्यांची भूमिका मंगला मराठे** यांनी समजावून सांगितली त्या सुधारणांचे महत्व व आज त्या सुधारणांसाठी आपले उत्तरदायित्व काय आहे यावर मुलांबरोबर चर्चा केली. सती कायद्यापासून अंधश्रध्दा निर्मूलनाचा कायदा, सुधारणा याबाबतीत माहिती देण्यात आली.

दुसऱ्या सत्रात रोहिणी कुलकर्णी व उल्का दिवाडकर यांनी मुलांना दिवाळी भेटकार्ड व आकाश कंदील बनविण्याचे प्रशिक्षण दिले.

**मुलींना सॅनिटरी पॅडस वाटप**

दत्तक पालक व बालरंग उपक्रमातील वयात आलेल्या मुलींना दर महिन्याला सॅनिटरी पॅडस देण्याचा नवीन उपक्रम या वर्षी ऑक्टोबर महिन्यापासून सुरु केला. दर महिन्याच्या चौथ्या शनिवारी हे वाटप केले जाते. या निमित्ताने या मुली व त्यांच्या मातांचा मेळावा आयोजित केला जातो. या उपक्रमात दत्तक पालक उपक्रमातील ७५ मुली सहभागी करुन घेतल्या आहेत.

- **संसर्गजन्य आजार - लक्षणे व उपाय - २३.११.२०२४**

  उल्का दिवाडकर आणि अंकिता भगत यांनी सामान्यतः येणारे साथीचे आजार त्यांची लक्षणे आणि साथ पसरु नये म्हणून घ्यावयाचे खबरदारीचे उपाय सांगीतले. विशेषत्वाने क्षय रोगा संबंधित माहिती सांगितली.

- **दैनंदिन अंधश्रध्दा - २८.१२.२०२४**

  रोजच्या जगण्यात कळत नकळत, किंवा भीतीपोटी पाळल्या जाणाऱ्या अंधश्रध्दा त्यातला फोलपणा आणि त्या रुजण्यामागची कारणे याबद्दल मंगला मराठे, रोहिणी कुलकर्णी यांनी मुलींशी संवाद साधला.

- **मासिक पाळी आणि अंधश्रध्दा - २५.०१.२०२५**

  मासिक पाळी भोवती असणाऱ्या अंधश्रध्दा व त्यातील फोलपणा याची शास्त्रीय माहिती अंनिसच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या **वंदना शिंदे** यांनी सांगितली.

- **मानसिक आरोग्य - २२.०२.२०२५**

  मानसशास्त्रज्ञ **मेधा लवेकर** यांनी उपस्थितांना मनःस्वास्थ म्हणजे काय? त्याचा आरोग्यावर आणि मुलांच्या निकोप वाढीवर होणारा परिणाम समजावून सांगितला.

# सर्वसाधारण कार्यक्रम

**मृणालताई गोरे स्मृति दिन - १६.०७.२०२३**

दि. १७/०७/२०२४ आदरणीय मृणालताई गोरे यांचा स्मृतिदिन यानिमित्त स्वाधार आणि केशव गोरे स्मारक ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने शेखर नाईक दिग्दर्शित **बलसागर भारत होवो** हा दृक श्राव्य अभिवाचनाचा कार्यक्रम आयोजित केला. हा कार्यक्रम साने गुरुजींच्या सामाजिक व राजकीय मौलिक मूल्यविचारांचा आणि त्यांनी केलेल्या आंदोलनांचा अभिवाचनाद्वारे घेतलेला मागोवा होय.

**मीनाक्षी आपटे जयंती दि. - १४.१२.२०२४**

११ नोव्हेंबर हा स्वाधारच्या एक संस्थापक अध्यक्ष प्रा. मीनाक्षी आपटे यांचा जयंतीदिन. या निमित्ताने स्वाधार दरवर्षी एका विषयावर स्मृती व्याख्यान आयोजित करीत असते.

यावर्षी दि १४-१२-२०२४ रोजी "**समाजमन घडविण्यात महिलांची भूमिका** (कशी आहे ? कशी असावी ? ) " या विषयावर आयोजित केला होता.

आज समाजातील वातावरण गढूळ झाले आहे. धर्म, जात, पंथ, राज्य यावरुन कटुता आलेली दिसते. समाज गटागटात विभागात चालला आहे. यातून बाहेर पडून निकोप सामाजिक वातावरण तयार व्हावे या दृष्टीने विचार करण्यासाठी हया वेबिनार मध्ये चर्चा करण्यात आली. अनेक संस्थांमधले सामाजिक कार्यकर्ते या चर्चेत सहभागी झाले.

**सावित्रीबाई फुले जयंती - ०३.०१.२०२५**

**या वर्षी सावित्रीबाई फुले जयंती निमित्त दोन कार्यक्रम आयोजित केले.**

**१) आंतर शालेय वक्तृत्व स्पर्धा.**

३ जानेवारी हा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जयंतिदिन. या निमित्त स्वाधार आणि केशव गोरे स्मारक ट्रस्ट संयुक्त विद्यमाने आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली. स्पर्धा तीन गटात घेतली विषय - इ. ५ वी, ६ वी साठी १) माझा आवडता खेळ आणि त्याचे फायदे आणि तोटे. २) पाणी वाचवा इ. ७ वी ८ वी साठी १) परिसर स्वच्छता २) आपले सामाजिक कर्तव्ये इ. ९ वी, १० वी साठी १) लोकप्रतिनिधी कसा असावा २) सामाजिक ऐक्याची आवश्यकता सर्व विद्यार्थ्यांनी हया विषयावर तयारी निशी चांगला सहभाग घेतला. एकूण ४९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. परीक्षक म्हणून श्रद्धा प्रभू खानोलकर, उर्मिला वालावलकर या माजी शिक्षिकांनी काम पाहिले.

**महिलांचा मेळावा - ०४.०१.२०२५**

सावित्रीबाई फुले जयंती निमित्त दि. ०४ जानेवारी २०२५ रोजी **महिलांसंबधीचे कायदे** या विषयावर **ॲड. जागृती गावकर** यांचे व्याख्यान ठेवले होते. स्त्रियांसंबधी कायदे, आर्थिक स्वावलंबनाचे महत्व ह्यावर त्यांनी मार्गदर्शन केले. मेळाव्यात स्वाधारकडे येणाऱ्या समस्याग्रस्त महिला, दत्तक पालक उपक्रमातील विद्यार्थिनींच्या माता व परिसरातील महिला सहभागी झाल्या.

**वर्धापन दिन - ०४.०२.२०२५**

४ फेब्रुवारी हा स्वाधारचा स्थापना दिवस. दरवर्षी या दिवशी स्वाधारच्या कार्यकर्त्यांचे एकदिवसाचे शिबीर मृणाल गोरे स्मृती दालनात आयोजित होते.

पहिल्या सत्रात गोरगाव पोलीस स्टेशनच्या निर्भया पथकाला निमंत्रित केले होते. या पथकाचे **उपनिरीक्षक भोळे, उपनिरीक्षक अमिता मराठे व त्यांचे सहकारी** सत्रात सहभागी झाले. प्रथम स्वाधारच्या अध्यक्षांनी पोलिसांकडून खास करुन गोरेगाव पोलीस स्टेशनकडून कार्यात मिळणाऱ्या सहकार्याबाबत कृतज्ञता व्यक्त केली. त्या नंतर या अधिकाऱ्यांनी महिलांची सुरक्षितता, पोलीस प्रोसिजर, पोलिसांची मदत कशी घ्यायची याबद्दल आणि विशेषत्वाने सायबर गुन्हे, त्या बाबतची सावधानता आणि उपाय यांची सविस्तर माहिती दिली.

दुसऱ्या सत्रात आंतरराष्ट्रीय महिला वर्षाला ५० झाल्याच्या निमित्ताने **मंगला मराठे आणि गीता पंडित** यांनी म. फुले आगरकर यांच्यापासून सूरु झालेल्या स्त्रीमुक्ती चळवळीचा धांडोळा घेतला. आजवरच्या चळवळीचा महिलांवर आणि कुटुंबांवर काय परिणाम झाला सार्वजनिक आणि वैयक्तिक आयुष्यात स्त्रिया किती मुक्त झाल्या. जागतिकीकरण आणि चंगळवादाचा स्त्रियांवर काय परिणाम झाला. इ. मुद्यांवर चर्चा झाली.

स्वाधारच्या सर्व शाखांच्या सर्व कार्यकर्त्या या शिबिरात सहभागी झाल्या.

**आंतरराष्ट्रीय महिला दिन - ०८.०३.२०२५**

८ मार्च महिला दिनानिमित्त केशव गोरे स्मारक ट्रस्ट आणि स्वाधार संयुक्त विद्यमाने **शिल्पा नवलकर लिखित "सेल्फी"** या नाटकांच्या अभिवचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आजच्या स्त्रियांना आयुष्याच्या एका वळणावर काही अनपेक्षित प्रश्न पडतात. रेल्वे स्टेशन च्या प्रतीक्षागृहात भेटलेल्या ह्या अनोळखी स्त्रियांमध्ये होणारा संवाद, त्यातून मिळालेली स्वतःच्या आयुष्यातील प्रश्नांची उत्तरे ह्या विषयावर सेल्फी हे नाटक त्यातील कलाकारांनी अभिवाचनाद्वारे उलगडून दाखवले. ह्या कार्यक्रमासाठी मोठया संख्येने प्रेक्षक उपस्थित होते.

### वसुधा नेने सहायता निधी

स्वाधारच्या माजी अध्यक्ष वसुधा नेने यांचे ०५-०५-२०२० रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या कुटुंबीयांनी स्वाधारला निधी देऊन समस्याग्रस्त महिलांसाठी कायमस्वरुपी काही उपक्रम चालू करण्याचा मनोदय व्यक्त केला. या निधीतून स्वाधारने वसुधा नेने सहाय्यता निधी उभारला. या निधीत नंतर काही देणगीदारांनीही भर घातली. या निधीतून दरवर्षी स्वाधारकडे येणाऱ्या समस्याग्रस्त महिलांपैकी एका महिलेला मदत देण्याचा ठराव करण्यात आला. महिला दिनाचे औचित्य साधून आम्ही ही मदत देतो. या वर्षी या निधीतून स्मिता पालकर या महिलेला शिवणाच्या व्यवसायासाठी आर्थिक मदत दिली. या वेळी मागील वर्षीची लाभार्थी कश्मिरा प्रधान यांनी या सहाय्याबद्दल त्यांचे मनोगत व्यक्त केले.

### “बुवा - बाबा आणि आपण” - २२.०३.२०२५

अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या **वंदना शिंदे** यांचे **“बुवा-बाबा आणि आपण”** या विषयावर व्याख्यान ठेवण्यात आले. त्यांनी प्रात्यक्षिकांसहित अंधश्रध्दा निर्मूलन विषयी दत्तक पालक विद्यार्थिनींना व त्यांच्या पालकांना माहिती दिली. त्यांनी वेगवेगळे चमत्कार करुन दाखवले आणि या चमत्कारांमध्ये त्यांनी विद्यार्थिनींनाही सहभागी करुन घेतले. या चमत्कारा मागचे विज्ञानही त्यांनी नंतर समजावून सांगितले.

# स्वाधार - चेंबूर शाखेचा अहवाल

**चेंबूर शाखेचा अहवाल**

मा. इंदूताई खानोलकर यांनी १९८८ साली चेंबूर, मुंबई येथे स्वाधारची शाखा सुरु केली. १९९५ पासून त्यांनी "शैक्षणिक प्रकल्प" हा लोकसहभागातून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घकातील मुलींना शालेय शिक्षणासाठी मदत देणारा अभिनव उपक्रम सुरु केला. या उपक्रमाद्वारे गरजू मुलींना शैक्षणिक साहित्य पुरविण्याबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्वविकासासाठी विविध कार्यक्रम, उपक्रम राबविण्यास सुरुवात केली. आज हा उपक्रम "दत्तक पालक उपक्रम" या नावाने स्वाधारच्या सर्व शाखांमध्ये राबविला जातो. या उपक्रमात चेंबूर शाखेत यावर्षी २२२ लाभार्थी विद्यार्थिनी आहेत.

| चेंबूर स्वाधार शाखेच्या दत्तक पालक उपक्रमातील लाभार्थी मुली खालील शाळांच्या विदयार्थिनी आहेत. | | |
|---|---|---|
| १) | स्वामी मुक्तानंद हायस्कूल, चेंबूर | ६२ |
| २) | मातोश्री विदयामंदिर, मानखुर्द | ५८ |
| ३) | नूतन विदयामंदिर, मानखुर्द | ४३ |
| ४) | अमरनाथ हायस्कूल, चेंबूर | ३३ |
| ५) | कुमुद विदया मंदिर | १३ |
| ६) | इतर शाळा | १३ |
| | एकूण | २२२ |

**मार्च २०२५ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत ४९ विद्यार्थीनी बसल्या होत्या त्यात ८०% पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विदयार्थिनींची नावे :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १) तृप्ती कोळेकर | ९४% | २) अनुष्का गायकवाड | ९२.२०% |
| ३) तन्वी डोंबाळे | ९०% | ४) निर्मिती ताम्हणेकर | ८८% |
| ५) रिया पाटील | ८६.६०% | ६) तिर्था सोनावणे | ८६% |
| ७) रोशनी कदम | ८६% | ८) माया आतदर | ८५.५०% |
| ९) तरिषा पवार | ८५% | १०) लेहेर पवार | ८४.८०% |
| ११) वेदिका शिंदे | ८४.२०% | १२) मोनिका गोपाळघरे | ८३.४०% |
| १३) अमृता गायकवाड | ८३.२०% | १४) अंकिता कदम | ८२.६०% |
| १५) जान्हवी शिरसाट | ८१.६०% | १६) श्रद्धा खरटमोल | ८०.६०% |
| १७) माधवी कदम | ८०.२०% | १८) दुर्गा घारे | ८०% |

**दत्तक पालक उपक्रमांतर्गत आयोजित केलेले कार्यक्रम :**

**१) शालेय साहित्य वाटप :- १५ जून व २२ जून २०२४**

दत्तक पालक उपक्रमातील २२२ मुलींना वह्या, स्कूल बॅग, छत्री, चित्रकला वही, रंगपेटी, ड्रॉईंग ब्रश, नटराज पेन इत्यादी शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले. मुलींना शालेय शुल्कासाठी व गणवेशासाठी प्रत्येकी रु १००० देण्यात आले.

**२) शालांत परीक्षा उत्तीर्ण विदयार्थिनींचा कौतुक समारंभ :- ६ जुलै २०२४**

ह्या वर्षी ३८ विदयार्थिनींचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला. इनरव्हिल क्लब चेंबुर तर्फे ७५ पेक्षा मार्क्स मिळविलेल्या २० विदयार्थिनींना कॉलेज बॅग, Wrist Watch व प्रमाणपत्रात बक्षीस म्हणून देण्यात आले.

श्रीमती मधुबाला चेंबूरकर यांनी केले. विदयार्थिंनीना पैशाच्या स्वरुपात बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले त्यांची नावे -

१. तनुजा शिंदे ९५.४०% - रु. २०००/-
२. आरती मोरे ९०.४०% - रु. १५००/-
३. वैष्णवी कोकरे ८९% - रु. १०००/-
४. स्नेहा सणस ८५.२०% - रु. ७५०/-
५. सांचिता कोकाटे ८२.५०% - रु. ७५०/-
६. समिक्षा वाघमारे ८०.८० % - रु. ५००/-
७. अमृता माने ७९.४०% - रु. ५००/-

स्वाधार चेंबूर च्या दत्तक पालक श्रीम. पारुल पटेल यांच्या वतीने १० विदयार्थिनींना कॉलेजबॅग गिफट म्हणून देण्यात आली.

स्वाधार चेंबूर शाखेने विदयार्थिनींना डॉक्युमेंट फोल्डर, स्टील बॉटल व १० विदयार्थिंनींना Wrist Watch भेट म्हणून देण्यात आले.

**३) आरोग्य तपासणी शिबीर :- २० जूलै २०२४**

डॉ. सीमा नटरेजा यांच्या सहकार्याने या शिबिरात ५० विदयार्थिनींच्या आरोग्याची तपासणी करुन न्यांनी रिपोर्ट दिले. त्यानुसार विदयार्थिनींना औषधे, गोळया दिल्या तसेच त्यांनी आरोग्याविषयी उपयुक्त माहिती सांगितली.

या शिबिरात इनरव्हिल क्लब ऑफ चेंबुर टियारा श्रीम. इरा सिंग, श्रीम. गीता मखवाना, श्रीम. योगिता ताटे उपस्थित होत्या.

**४) राखी बनविण्याची कार्यशाळा :- १७ ऑगस्ट २०२४**

स्वाधार चेंबूरच्या श्रीम. सुप्रिया बोडाजी यांनी १० वी च्या विदयार्थिनींना राखी बनविण्याचे प्रशिक्षण दिले. विदयार्थिनींनी ३ प्रकारच्या सुंदर राख्या बनविल्या. मुलींनी बनविलेली राखी मुलींना गिफ्ट म्हणून देण्यात आली. या कार्यशाळेत श्रीम. ईरा सिंग, रेश्मा टंडन, श्रीम. योगिता ताटे उपस्थित होत्या.

**५) करियर गाईडन्स् :- २२ ऑगस्ट २०२४**

स्वाधार चेंबूर शाखेने मुक्तांनद शाळेतील सभागृहात इ. ९ वी १० वी साठी करिअर गाईडन्स हा कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते श्री. पृथ्वी सर यांनी विदयार्थिनींना करियर बदृल विशेष मार्गदर्शक माहिती सांगितली.

या कार्यक्रमात इनराव्हिल क्लब ऑफ चेंबूर, टियारा च्या प्रतिनिधी व सभासद उपस्थित होते.

**६) तोरण प्रशिक्षण :- २८ ऑगस्ट २०२४**

तोरण बनविण्याचे प्रशिक्षण दत्तक विदयार्थिनींच्या आईंसाठी ठेवण्यात आले होते. श्रीमती रुपाली मेहता यांनी महिलांना तोरणाचे छान प्रशिक्षण दिले. इनरव्हिल चेंबूर तर्फ्रे सामान देण्यात आले होते व त्यांचे सर्व सभासद उपस्थित होते. तसेच तोरण आईंना गिफ्ट म्हणून देण्यात आले.

**७) मातीपासून गणपती बनविण्याची कार्यशाळा :- ३१ ऑगस्ट २०२४**

इ. ८ वी ते १० वी च्य २२ विदयार्थिनींना श्रीम.रितू मॅडम यांनी गणपती बनविण्याचे प्रशिक्षण दिले. इनरव्हिल टियारातर्फे सामान देण्यात आले. या कार्यक्रमात श्रीम. ईरासिंग, श्रीम. रेश्मा टंडन, डॉ. सुषमा वझीर, श्रीम. गीता मखवाना, श्रीम. रुपाली मेहता सहभागी होत्या.

**८) दिवाळीच्या पणत्या रंगविण्याची कार्यशाळा :- ५ संप्टेंबर २०२४**

इ. ७ वी, ८ वी च्या २३ विदयार्थिनींना श्रीम. रुपाली मेहता यांनी पणत्या व रंगाचे साहित्य दिले व पणत्या रंगविण्याचे प्रशिक्षण दिले. स्वाधार व इनरव्हिल क्लब तर्फे ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. मुलींनी खूप सुंदर रित्या रंग भरुन पणत्या तयार केल्या. रंगविलेल्या पणत्या मुलींना वाटून दिवाळीच्या शुभूच्छा दिल्या.

**९) साक्षरता वर्ग :- २८ सप्टेंबर २०२४ ते जानेवारी २०२५**

स्वाधार चेंबूर शाखेत कमी शिकलेल्या महिलांसाठी साक्षरता वर्ग चालू करण्यात आला. आठवडयातून दोन दिवस सोमवार व शुक्रवार साक्षरता वर्ग घेण्यात आले.

इनरव्हिल क्लब चेंबूरच्या श्रीम. आरती व श्रीम. अलका नाटेकर यांनी महिलांना शिकविते.

**१०) दिवाळी भेटकार्ड बनविण्याची कार्यशाळा :- २ ऑक्टोंबर २०२४**

इ. ७ वी च्या २० विदयाथिनींनी या कार्यशाळेत सहभाग घेतला होता. स्वाधार चेंबूर च्या दत्तक पालक श्रीम. पारुल पटेल व दिपाली पटेल यांनी भेटकार्ड बनविण्याचे साहित्य देऊन प्रशिक्षण ही दिले. श्रीम. सुप्रिया बोडाजी व उराली बोडाजी यांचा सहभाग होता. श्रीम. कमला पटेल यांच्यातर्फे मुलींना स्नॅक्स देण्यात आला.

**११) कविता पाठांतर स्पर्धा :- ५ ऑक्टोंबर, २६ ऑक्टांबर, १६ नोव्हेंबर २०२४**

इ. ५ वी ते ७ वी च्या विदयार्थिनींची ही स्पर्धा तीन सत्रांमध्ये आयोजित केली होती. स्वाधारचे दत्तक पालक श्रीम. नीशा पटेल, श्रीम. सुप्रिया बोडाजी, श्रीम. कुसुम चोप्रा, श्रीमती. कल्पना देसाई शिवसुष्टीच्या श्रीम. सविता दाबके, श्रीम. वंदना खरे, श्रीम. माधुरी रावराणे यांनी स्पर्धेचे परिक्षक म्हणून काम पाहिले.

**१२) अक्षरगंध दिवाळी अंक प्रकाशन :- २६ ऑक्टोबर २०२४**

स्वाधार चेंबूर शाखेने हा कार्यक्रम मातोश्री विदयामंदिर मानखुर्द शाळेत आयोजित केला होता. प्रकाशन सोहळयासाठी प्रमुख अतिथी **श्रीम. मधुवंती सप्रे, ॲडव्होकेट जागृती गांवकर, श्रीम. करुणाताई पाटील** उपस्थित होते.

श्रीम.मधुवंती सप्रे ताई यांचे हे पुस्तक श्रीम. मेधाताई पाटकर यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. श्रीम. मधुवंती सप्रे यांनी कुसुमाग्रज यांच्या काहि कविता प्रस्तुत केल्या श्रीम. मेधाताई पाटकर व श्रीम मधुवंती सप्रे यांनी स्वतः लिहिलेल्या कविता ही सादर केल्या.

स्वाधारची अमरनाथ शाळेची विदयार्थिनी वैष्णवी आग्रे हिने कुसुमाग्रजांची कणा ही कविता सादर केली.

ॲड. जागृती गावकर यांनी उपस्थितांसमोर उपयुक्त, मार्गदर्शक माहिती सांगितली व मुलींना वही व पेन वाटले.

**१३) चित्रकला स्पर्धा :- ऑक्टोंबर २०२४**

इ. ५ वी ते ९ वी च्या विदयार्थिनींची चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती.

**चित्रकलेचे विषय :-**

१) माझा आवडता कार्टुन
२) माझा आवडता खेळ
३) गडावरील सहल
४) ठसे काम
५) शेतात काम करणारी माणसे

ह्या विषयावर मुलींनी सुंदर चित्रे काढली.

ह्या स्पर्धेचे परीक्षण श्रीम. पारुल पटेल यांनी केले. याची बक्षीसे ३ जानेवारीच्या कार्यक्रमामध्ये देण्यात आली.

## १४) वक्तृत्व स्पर्धा :- १५ नोव्हेंबर, ७ डिसेंबर २०२४

इ. ८ वी, ९ वी, च्या विदयार्थिनींसाठी ही स्पर्धा दोन सत्रामध्ये आयोजित केली होती. चेंबूर महिला समाजाच्या अध्यक्षा श्रीम. मेधाताई केतकर डॉ. अंजली करंदीकर श्रीम. मधुबाला चेंबुरकर, श्रीम. सुप्रिया बोडाजी यांनी स्पर्धेचे परिक्षक म्हणून काम पाहिले.

स्पर्धेचे विषय - १) वाचन, पुस्तक, महत्व - इ. ८ वी साठी २) स्त्री, आत्मविश्वास, निर्भर - इ. ९ वी साठी. वरील शब्दांचा वापर करुन मनोगत व्यक्त करायचे होते. स्पर्धेतील विजेत्या मुलींना ३ जानेवारीला बक्षीस देण्यात आली.

## १५) नाताळ भेटकार्ड प्रशिक्षण :- २५ डिसेंबर २०२४

इ. ७ वी च्या विदयार्थिनींसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. **श्रीम. सुप्रिया बोडाजी** यांनी खूप सुंदर कार्ड बनविण्याचे प्रशिक्षण मुलींना दिले. तसेच इनरव्हिल क्लब, टियारा ने कार्ड बनविण्याचे साहित्य देऊन प्रशिक्षणही दिले.

या कार्यशाळेमध्ये **श्रीम. ईरा सिंग** व त्यांचे सर्व सभासद सहभागी होते. त्यांच्यावतीने मुलींना खाऊ देण्यात आला.

## १६) सावित्रीबाई फुले व मा. इंदूताई खानोलकर यांचा जन्मदिवस :- ३ जानेवारी २०२५

हा कार्यक्रम मुक्तानंद शाळेतील सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे **ॲड. जागृती गांवकर**, अतिथी चेंबूर महिला समाजाच्या अध्यक्षा श्रीम. मेधाताई केतकर, शिवसृष्टी मंडळाच्या सेक्रेटरी श्रीम. सविता दाबके, सोशल वर्कर श्रीम. सई तांबे कार्यक्रमाचे सूत्र संचालन व स्वागत शिक्षण सहाय्य उपक्रमातील विदयार्थिनी श्वेता निवळकर, समिक्षा दळवी, वैष्णवी कोकरे यांनी केली. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व साने गुरुजींची प्रार्थना सादर करुन झाली.

विद्यार्थ्यीनींनी गणेश वंदना शिवकन्या, गोंधळ, मर्दानी नृत्य सादर केले तसेच सावित्रीबाई फुले, सोशल मिडीया असा विषयांवर नाटिका सादर केल्या.

ॲड. जागृती गांवकर यांनी स्त्रियांच्या शिक्षणाबददृल व त्यांच्या कायदेशीर टक्कांबददृल खूपच उपयुक्त व मार्गदर्शक माहिती सांगितली. मुलामुलींमध्ये भेदभाव न करता समान वागणूक दिली पाहिजे. स्त्रियांचा आदर व मान राखला पाहिजे. स्त्रियांनी सक्षमपणे जीवन जगले पाहिजे.

**श्रीम. सई तांबे** यांनी मुलींसमोर मोलाचे विचार मांडले की तुम्हाला आनंद मिळतो असे काम करा. कितीही कठीण परिस्थिती असली तरी त्यावर मात करुन शिक्षण घेतले पाहिजे. कोणत्याही गोष्टीला न घाबरता, निराश न होता नवनवीन गोष्टी शिकले पाहिजे. शिक्षणाचे महत्व पटवून दिले.

या दिवशी मनोरंजनात्मक कार्यक्रम, कविता, वकृत्व, चित्रकला स्पर्धांचा बक्षीस समारंभ याचे आयोजन केले होते.

प्रमुख पाहुणे व अतिथी, उपस्थित मान्यवर व दत्तक पालकांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला.

स्वाधार चेंबूरच्या वतीने विजेत्यांना वॉच, पिकनिक बॅग, स्टोरी बुक, स्टील बॉटल म्हणून देण्यात आले. सर्व उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला.

**१७) सर्वायकल कॅन्सर वर मार्गदर्शक कार्यक्रम :- ११ फेब्रुवारी २०२५**

स्वाधार चेंबूर च्या सहकार्याने मातोश्री विद्यामंदिर शाळेत इनरव्हिल क्लब ऑफ चेंबूर टियारा तर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सूर्या हॉस्पिटल, चेंबूर च्या स्त्रीरोग तज्ञ डॉ. किर्ती शंखाधर यांनी मातोश्री शाळेतील इ. ९ वी, १० वी च्या विद्यार्थिनींना व त्यांच्या मातांना सर्वायकल कॅन्सर विषयी खूप उपयुक्त मार्गदर्शनपर माहिती सांगितली. ९ ते १८ वयोगटातील मुलामुलींसाठी ह्यावरील वॅक्सिन देण्यात आले.

या कार्यक्रमात **डॉ. सुषमा वझीर, श्रीम. रेश्मा टंडंन** उपस्थित होत्या. मातोश्री शाळेचे मुख्याध्यापक, विश्वस्त **श्रीम. करुणाताई पाटील**, **श्रीम. भाकरे मॅडम, श्रीम. वनिता सरगर** शिक्षक उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या दिवशी स्वाधार चेंबूरने महिलांना मूग हे कडधान्य वाटले.

**१८) विदयार्थिनींबरोबर चित्रपट :- २६ फेब्रुवारी २०२५**

स्वाधार चेंबूर शाखेने स्वाधारच्या ९० मुलींना चेंबूरच्या थिएटरमध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा छावा चित्रपट दाखविण्यात आला. सर्व मुंलीना खाऊ देण्यात आला.

**शिक्षण सहाय्य उपक्रम :- २०२४ - २०२५**

शिक्षण सहाय्य उपक्रमात यावर्षी फिजिओथेरेपीस्ट, कॉम्पुटर सायन्स, बी, फार्मसी, आय.टी., इंजिनियरिंग, बी.एम.एस., बी कॉम अशा १२ विदयार्थ्यांना महाविदयालयीन व उच्च शिक्षणासाठी श्री. मोहन कॉरी, इनरव्हिल क्लब ऑफ चेंबूर, श्रीम. मधुबाला चेंबुरकर व श्री. सोनल जोस यांनी आर्थिक मदत दिली.

# मुलुंड शाखेचा अहवाल

स्वाधारची मुलुंड शाखा १९९१ पासून कार्यरत आहे. ही शाखा विशेष करून ग्रामीण व आदिवासी भागात तेथील शाळांमधून शैक्षणिक तसेच जीवन शिक्षणाचे उपक्रम राबवते आणि तेथील महिलांसाठी प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करते.

स्वाधारच्या सर्व शाखांच्या कार्यकर्त्यांसाठी ऑनलाईन चर्चा व कार्यशाळांचे आयोजन मुलुंड स्वाधार तर्फे करण्यात येते.

**ग्रामीण प्रकल्पांतर्गत घेतलेले कार्यक्रम**

**१) ग्रामीण भागात महिलांचा मेळावा - ०८.१०.२०२४**

पिंपळगाव, तालुका जुन्नर येथे कुमुद वराडी यांनी दरवर्षीप्रमाणे नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने महिलां साठी प्रबोधन पर व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला.

विषय होता 1) चाळीशी नंतर स्त्रियांचे आरोग्य. हा काळ रजो निवृत्ती चा असतो या काळात शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी कशी घ्यावी? कोणत्या तपासण्या करून घ्याव्यात? याची माहिती दिली 2) दुसरा विषय होता लिंग समभाव मुलींची व स्त्रियांची छेडछाड बलात्कार अत्याचार याला आळा घालायचा असेल तर प्रत्येक आईने समाजात कसे वागायचे याची शिकवण आपल्या मुलीं प्रमाणेच मुलांनाही लहानपणा पासूनच दिली पाहिजे. असे त्यांनी सांगितले स्वतः मुला मुली मध्ये भेद न करता त्यांच्या मनात एकमेकांविषयी आदर निर्माण केला तर ते त्यांच्याशी गैरवर्तन करणार नाही व स्त्रियांच्या हिंसे प्रकरणी आळा बसू शकतो.

**२) आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी जीवनशिक्षण कार्यक्रम-०८.०२.२०२५**

गाव कर्हे, तालुका पालघर, येथील आदिवासी आश्रम शाळेत मुला मुलींसाठी जीवन शिक्षण कार्यशाळा घेण्यात आली प्रथम त्यांना 'वयात येताना' ही चित्रफित दाखवून किशोरवयीन मुलांमध्ये होणाऱ्या शारीरिक मानसिक व सामाजिक बदलांची शास्त्रीय माहिती दिली. नंतर स्त्री पुरुष समानता जीवन कौशल्य व व्यक्तिमत्व विकास या विषयांवर चर्चा झाली मुलांच्या मनात बऱ्याच शंका होत्या व गैरसमज होते त्यांचे शास्त्रीय पद्धतीने निरसन केले. राधा कर्णिक, रेखा जाधव, गीता प्रभू, हर्षना खांडवीलकर व गीता पंडित यांनी मार्गदर्शन केले २५० मुलगे व १५० मुली उपस्थित होत्या. मुला मुलींचा कार्यक्रम वेगळा घेतला.

**३) आदिवासी भागातील कार्याकार्तासाठी प्रशिक्षण शिबीर - ०८.०२.२०२५**

जव्हार येथील दिव्यविद्यालय व विकलांग मुलांसाठीच्या गुलमोहर निवासी शाळेला भेट व केशव सृष्टी ग्राम स्वास्थ्य आत्मनिर्भर योजने मध्ये काम करणाऱ्या स्वास्थ्य रक्षक कार्यकर्त्यांना जीवन

शिक्षण उपक्रमाची माहिती दिली. योजनेमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या. होत्या त्याना "मुलगी वयात येताना" ही चित्रफीत दाखवली व जीवन शिक्षण उपक्रमाची माहिती दिली. वाडा मोखाडा विक्रमगड व आजूबाजूच्या आदिवासी पाड्यातून काम करणाऱ्या ३५ आरोग्य रक्षक दांपत्यांसाठी जीवनशिक्षणाचे एक प्रशिक्षण शिबीर घेण्याची विनंती केली आहे. असे शिबीर लवकरच आयोजित होईल.

## ४) ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी जीवनशिक्षण कार्यक्रम २६-०२-२०२५

